# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, २ रा मजला, दक्षिण कक्ष, बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४.

दूरध्वनी: (०२२) २७५७१६७३, २७५७०१६६, २७५७१६७७.फॅक्स : (०२२) २७५७०९६९व २७५७१६६६


जा.क्र.मजीप्रा-२०१९/प्र.क्र.४/आ-६ दिनांक: ११ .०८.२०२३

कनिष्ठ अभियंता यांना शाखा अभियंतांचा पदाचा दर्जा मंजूर करणेबाबत.

## // आदेश //

**संदर्भ :** १) महाराष्ट्र शासन, पाटबंधारे विभाग, शासन निर्णय क्र. सीडीएस-१५८२/१५८/(२१५)/आ-१०, दिनांक १६.४.१९८४

२) महाराष्ट्र शासन, पाटबंधारे विभाग, शासन निर्णय क्र. बीसीएस-२४८४/१०७/आ-२, दि. २८.९.१९८४

३) महाराष्ट्र शासन, पाटबंधारे विभाग, शासन परिपत्रक क्र.जेष्ठता-११८८/(१३४/८८) आ.स.अ.श्रे.२, दिनांक १२.४.१९८९

४) महाराष्ट्र शासन, पाटबंधारे विभाग, शासन निर्णय क्र. एमएससी-१०८४/६१/आ (सेनि), दि. १६.६.१९९७

५) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्ण क्र.इएसटी-१०९७/प्र.क्र.३७०/पापु-२३, दि. ८.२.९९

६) महाराष्ट्र शासन, पाटबंधारे विभाग, शासन निर्णय क्र. नियुक्ती-१२९९/(१४/९९)/आ (शा.अ.), दिनांक ९.२.२०००

७) महाराष्ट्र शासन, पाटबंधारे विभाग, शासन निर्णय क्र. नियुक्ती-१२९९/(७६/२०१०)/आ.(शा.अ.), दिनांक ९.७.२०१०

८) महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र. एसयुटी-१२११/प्र.क्र.२४७/आस्थापना (शा.अ.), दि.६.१२.२०१४

९) शासन अधिसुचना, जलसंपदा विभाग, दिनांक २५ एप्रिल, २०१८

१०) मध्यवर्ती कार्यालयाचे दिनांक २५ मे २०१८ रोजीचे पत्र.

११) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र. शाअद-२०१८/प्र.क्र.२१/आस्था-१, दिनांक ७.८.२०१९

१२) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे दिनांक २७ जानेवारी, २०२२ रोजीचे पत्र

१३) मध्यवर्ती कार्यालयाचे पत्र क्र. मजीप्रा-२०१७/शा.अ./दर्जोन्नती/वे.नि./२५७/आ-६, दिनांक १५.६.२०२२

१४) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र. शाअद-२०१८/प्र.क्र.२१/आस्था-१, दिनांक ३०.१.२०२३

१५) मध्यवर्ती कार्यालयाचे पत्र क्र. मजीप्रा-२०१७/शा.अ./दर्जोन्नती/वे.नि./२५७/आ-६, दि. २०.३.२०२३

संदर्भ क्र.५ येथील दिनांक ८/२/१९९९ रोजीच्या शासन निर्णयान्वये म.जी.प्रा. तील अभियांत्रिकी (स्थापत्य) संवर्गातील विविध पदांना पाटबंधारे विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेले सेवाभरतीचे नियम जसेच्या तसे लागू करण्यात आलेले आहेत.

२. संदर्भ क्र.१ येथील दिनांक १६ एप्रिल, १९८४ नुसार दिनांक १/४/१९८१ पासून पाटबंधारे खाते व सार्वजनिक बांधकाम विभाग या दोन्ही खात्याच्या अंतर्गत स्थापत्य, यांत्रिकी, विद्युत, व यांत्रिकी पदांवर कार्यरत असलेल्या पदविधर कनिष्ठ अभियंत्यांना तसेच भविष्य काळात या नेमणुकीसाठी सेवेत भरती होणाऱ्या पदविधर अभियंत्यांना आणि ५, ७ व १० वर्षे सेवा काळपूर्ण केलेल्या पदविकाधारक व अर्हता रहित कनिष्ठ अभियंत्यांना "राजपत्रित अधिकारी वर्ग-२ (कनिष्ठस्तर) असा दर्जा देण्यात यावा.

३. संदर्भ क्र.३ येथील दिनांक १२/४/१९८९ अन्वये कनिष्ठ अभियंत्यांना शाखा अभियंता दर्जा दिल्यानंतर करावयाच्या वेतननिश्चिती संदर्भात सूचना दिल्या आहेत.

४. संदर्भ क्र.४ येथील दिनांक १६ जुन, १९९७ अनुसार शासनाच्या सेवेत कनिष्ठ अभियंता पदावर कार्यरत असलेल्या पदवीधर कनिष्ठ अभियंतांना तसेच भविष्यात भरती होणाऱ्या पदवीधर अभियंतांना ५,७ व १० वर्षे सेवाकाळ पूर्ण केलेल्या पदवीधारक व अर्हतारहित कनिष्ठ अभियंत्यांना राजपत्रित अधिकारी वर्ग-२ (कनिष्ठ स्तर) दर्जा देण्याबाबत तरतुद आहे.

५. संदर्भ क्र.६ शासन निर्णय, पाटबंधारे विभाग, क्र. नियुक्ती १२९९/(१४/९९) आ.(शा.अ.), दिनांक ९/२/२००० मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे

परिच्छेद क्र. १ : शासन निर्णय, दिनांक १६/४/१९८४ व २८/९/१९८४ प्रमाणे कनिष्ठ अभियंत्यांना शाखा अभियंतांचा दर्जा देण्यासाठी विहित करण्यात आलेल्या शैक्षणिक अर्हता, सेवा कालावधी व गोपनीय अहवालाचे निकष सुधारणा करण्यात आली आहे.

परिच्छेद क्र.२ : दिनांक १/४/१९९८ व तद्नंतर शाखा अभियंता पदावर नियुक्ती देण्यासाठी विहित सेवा कालावधी पुर्ण करण्याऱ्या कनिष्ठ अभियंतांना शाखा अभियंता पदाचा दर्जा देण्यासाठी मागील पाच वर्षाचे गोपनीय अहवाल विचारात घेण्यात येतील व पात्रतेसाठी गोपनीय अहवालाची सरासरी "चांगला" पेक्षा कमी नाही, असा निकष राहील.

परिच्छेद क्र.५ : दिनांक १६/४/१९८४ व दिनांक २८/९/१९८४ चे आदेश दिनांक १/४/१९९८ व त्यानंतरच्या प्रस्तावासाठी याव्दारे अधिक्रमित/सुधारीत झाले आहेत, असे समजावे.

६. संदर्भ क्र.७ येथील दिनांक ९/७/२०१० मधील परिच्छेद क्र.२ मध्ये नियमानुसार विभागीय परीक्षा आणि मराठी/हिंदी परीक्षा उत्तीर्ण होणे वा सुट मिळणे गरजेचे आहे. शासन निर्णय, ९/२/२००० नुसार मागील ५ वर्षाचे अहवालांची सरासरी प्रतवारी "चांगला" पेक्षा कमी नसावी असा निकष आहे.

७. संदर्भ क्र.८ येथील दिनांक ६/१२/२०१४ शासन निर्णयतील तरतुदीनुसार कार्यवाही करणेबाबत मध्यवर्ती कार्यालयीन दिनांक १७/३/२०१७ रोजीच्या पत्रान्वये म.जी.प्रा.च्या क्षेत्रिय कार्यालयांना कळविण्यात आले होते. त्यानुसार मध्यवर्ती कार्यालयाने तसेच क्षेत्रिय कार्यालयाने कार्यवाही करुन त्याअनुषंगाने संबंधितांचे वेतन व भत्त्याच्या फरकाची रक्कम त्यांना अदा केलेली आहे. यानुसार मध्यवर्ती कार्यालयातील अभियंत्यांनी फरकाची रक्कम त्यांना अदा करणेबाबत विनंती केली होती. त्यानुसार फरकाची रक्कम अभियंत्यांना अदा करणेबाबत मा.सदस्य सचिव, यांचे मान्यतेने म.जी.प्रा. च्या वित्त शाखेस कळविण्यात आले होते.

परंतु म.जी.प्रा.च्या वित्त शाखेने मध्यवर्ती कार्यालयातील अभियंत्यांना त्यांचे फरकाची रक्कम अदा न करता शासन निर्णय, पा.पु. व स्व.विभाग, दिनांक ८/२/१९९९ अनुसार म.जी.प्रा. तील अभियांत्रिकी (स्थापत्य) संवर्गातील विविध पदांना पाटबंधारे विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेले सेवाभरतीचे नियम तसेच्या तसे लागू करण्यात आलेले आहेत. सदर सेवाभरतीचे नियमाबाबत अधिसुचना निर्गमित होण्यास अवधी लागणार असल्यामुळे पाटबंधारे विभागाचे सेवाभरतीचे नियम पा.पु. व स्व.विभागाने त्यावेळी लागू केले. तथापि, पा.पु. व स्व. विभागाने सेवाभरतीचे नियम अधिसुचनेच्या स्वरुपात निर्गमित केल्याचे दिसून येत नाहीत. असे वित्त शाखेचे आक्षेप होते.

उपरोक्त वित्त शाखेच्या आक्षेपाच्या अनुषंगाने मध्यवर्ती कार्यालयीन दिनांक २५/५/२०१८ रोजीच्या पत्रान्वये मार्गदर्शन करावे, अशी पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना विनंती केलेली होती. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने दिनांक २७/१/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सद्यस्थितीत शाखा अभियंता हा संवर्ग निर्माण करण्यासाठी शासन मान्यतेची आवश्यकता नसून कनिष्ठ अभियंत्यांना शाखा अभियंता पदी पदोन्नती देण्यासंदर्भात व पर्यायाने वेतनवाढी लागू करण्यासंदर्भात जलसंपदा विभागाचे शासन निर्णय व अधिसूचना स्वयंस्पष्ट असून त्यानुसार आवश्यक नियमोचित कार्यवाही करावी. असे म.जी.प्रा.स मार्गदर्शन केलेले आहे.

८. संदर्भ क्र.९ येथील दिनांक २५ एप्रिल, २०१८ अन्वये शासन अधिसुचना दिनांक १६ जुन, १९९७ मधील कलम क्र. ४, ५ व ६ मध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्यात आली आहे.

कलम क्र.४ : कलम क्र. ३ मधील (अ), (ब), (क) व (ड) मधील अर्हता व अनुभव धारण करणाऱ्या कनिष्ठ अभियंता यांना शाखा अभियंता या पदावर नियुक्ती देण्यापुर्वी, कनिष्ठ अभियंता पदासाठी महाराष्ट्र सार्वजनिक बांधकम नियम पुस्तिकेमधील परिष्ट-१ मध्ये विहित केलेली व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण करणे अनिवार्य असेल,

कलम क्र.५ : शाखा अभियंता गट-ब या पदावर नियुक्ती देण्यापुवी त्या व्यक्तीस नियमानुसार मराठी व हिंदी भाषा परीक्षा, जर ती व्यक्ती आधीच या परीक्षा उत्तीर्ण नसेल तर अथवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात आली नसेल तर, उत्तीर्ण होणे अनिवार्य असेल.

कलम क्र.६ : शाखा अभियंता गट-ब या पदावर नियुक्ती देण्यापुवी त्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहीत केलेले संगणक हाताळणी/वापराबाबचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

९. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र. शाअद-२०१८/प्र.क्र.२१/आ-१, दिनांक ७.८.२०१९ अन्वये सार्वजनिक बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) यांना दि.१.४.२०१८ पासुन शाखा अभियंता (स्था) म्हणून दर्जोन्नती देण्यात आली आहे. या आदेशातील अट क्र.३ मध्ये खालीलप्रमाणे तरतुद नमुद केले आहे.

शाखा अभियंता (स्थापत्य) गट "ब" या पदावर नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस नियमानुसार विभागीय परिक्षा आणि मराठी व हिंदी परिक्षा, जर ती व्यक्ती आधीच या परीक्षा उत्तीर्ण नसेल तर अथवा अशा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सुट देण्यात आली नसेल तर, उत्तीर्ण होणे आवश्यक असेल. जर संबंधीत कनिष्ठ अभियंता विभागीय परिक्षा आणि मराठी / हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण झाले नसतील किंवा अशा

परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सुट देण्यात आली नसेल तर त्यांना शाखा अभियंता पदाचा दर्जा दिल्याच्या दिनांकापासून शाखा अभियंता पदाची वेतनश्रेणी लागु करावी. परंतू त्यांना पुढील वेतनवाढी देण्यात येऊ नयेत. वयाची ४५ वर्षे पूर्ण झाल्याने विभागीय परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सुट देण्यात आलेल्या कनिष्ठ अभियंत्यांना त्यांच्या वयाची ४५ वर्षे पूर्ण झाल्याच्या दिनांकापासून शाखा अभियंता पदाची वेतनश्रेणी दिल्याच्या दिनांकापासून नियमित वेतनवाढी दिल्या आहेत, असे गृहीत धरुन होणारे वेतन देण्यात यावे. मात्र त्यांना वरीलप्रमाणे गणना केलेल्या काल्पनिक वेतनवाढीची थकबाकी अनुज्ञेय असणार नाही.

१०. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र. शाअद-२०१८/प्र.क्र.२१/आस्था-१, दिनांक ३०.१.२०२३ अन्वये शासन निर्णय दिनांक ७.८.२०१९ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.३ वगळण्यात आला आहे. त्यानुसार मध्यवर्ती कार्यालयाचे दिनांक २०.३.२०२३ च्या पत्रान्वये मध्यवर्ती कार्यालयाचे दिनांक १५.६.२०२२ रोजीच्या पत्रातील परिच्छेद क्र.९ वगळण्यात येत असल्याबाबत सर्व प्रादेशिक विभाग व म.जी.प्रा.च्या वित्त शाखेस कळविण्यात आले आहे.

११. संदर्भात नमुद केलेले सर्व अधिसूचन, शासन निर्णय व पत्र यामधील तरतुदी विचारात घेऊन प्रादेशिक विभागांकडून प्राप्त झालेले कनिष्ठ अभियंता यांना शाखा अभियंता पदाचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव मध्यवर्ती कार्यालयाचे आदेश दिनांक १९.४.२०१४ अन्वये गठीत केलेल्या शाखा अभियंता पदाचा दर्जा देण्याचे अधिकार प्रदान करणाऱ्या समिती समोर ठेवण्यात आला होता. समितीने केलेल्या शिफारशी स्विकृत प्राधिकारी यांची मान्यता घेऊन, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या सोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये दर्शविलेल्या एकुण १८ कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/यांत्रिकी/विद्युत) यांना त्यांच्या नावासमोरील रकाना क्र. ८ मध्ये दर्शविलेल्या दिनांकापासून महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम-२०१९, दिनांक ३० जानेवारी, २०१९ नुसार दिनांक १.१.२०१६ पासुन वेतनस्तर एस-१५ रु. ४१८००-१३२३००/- या वेतनश्रेणी शाखा अभियंता पदाचा दर्जा मंजूर करण्यात येत आहे.

१२. या आदेशान्वये शाखा अभियंता म्हणून दर्जा देण्यात आलेल्या कनिष्ठ अभियंत्यांची वेतननिश्चिती, त्यांना ज्या दिनांकापासुन शाखा अभियंता पदाचा दर्जा देण्यात येत आहे. त्या दिनांकास अस्तित्वात असलेल्या वेतन निश्चितीच्या नियमानुसार करण्यात यावी. वेतननिश्चिती विषयीचा फेरविकल्प संबंधीतांनी महाराष्ट्र शासन, पाटबंधारे विभाग, शासन निर्णय क्रमांक सीडीएस/१५८२/१५८/(२१५)/आ (१०), दिनांक १९ जुलै, १९८४ मधील तरतुदीनुसार १ महिन्याचे मुदतीत द्यावा. या मुदतीत त्यांनी असा फेरविकल्प न दिल्यास, शाखा अभियंता पदाचा दर्जाच्या दिनांकापासुन त्यांनी वेतननिश्चितीचा विकल्प दिला आहे, असे समजण्यात येईल.

सदस्य सचिव यांच्या मान्यतेने.

सोबत :- परिशिष्ट- अ

(दिपाली देशपांडे सावेडकर)
मुख्य प्रशासकीय अधिकारी

**प्रत : माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.**

- संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, बेलापुर, नवी मुंबई
- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, ठाणे/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/

अमरावती/ नागपुर

- अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, ठाणे/ पनवेल/ पुणे/ सांगली/ नाशिक/ अहमदनगर/

जळगांव/ औरंगाबाद/ नांदेड/ लातुर/ अमरावती/ अकोला/ नागपुर/ चंद्रपुर/ (यांत्रिकी मंडळ, ठाणे/नागपुर)

- कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, पालघर/सातारा/कराड/कोल्हापुर/सांगली/ नाशिक/ जळगांव /औरंगाबाद/ बीड/जालना/ नांदेड/ लातूर/ नागपुर/गोंदिया अमरावती/अकोला
- लेखा अधिकारी (रो.शा.), म.जी.प्रा. मध्यवर्ती कार्यालय, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई
- उप अभियंता, आय.टी.सेल, म.जी.प्रा. मध्यवर्ती कार्यालय, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.

श्री.व्ही.बी. मतवाडकर, कनिष्ठ अभियंता (म.जी.प्रा.मंडळ, सांगली यांचेमार्फत)
श्री.एस.एस. कांबळे, कनिष्ठ अभियंता (म.जी.प्रा.मंडळ, सांगली यांचेमार्फत)
श्री.ए.आय.खाडे, कनिष्ठ अभियंता (म.जी.प्रा.मंडळ, सांगली यांचेमार्फत)
श्री.एम.एल. पारके, कनिष्ठ अभियंता (म.जी.प्रा.मंडळ, सांगली यांचेमार्फत)
श्री.वाय.व्ही. पाटील, कनिष्ठ अभियंता (म.जी.प्रा.मंडळ, पुणे यांचेमार्फत)
श्री.एम.आर. जंगम, कनिष्ठ अभियंता (म.जी.प्रा.मंडळ, पुणे यांचेमार्फत)
श्री.आर.टी. देऊसकर, कनिष्ठ अभियंता (म.जी.प्रा.मंडळ, सांगली यांचेमार्फत)
श्री.बी.के. कोरेगांवे, कनिष्ठ अभियंता (म.जी.प्रा.मंडळ, सांगली यांचेमार्फत)
श्री.एम.बी.पाटील, कनिष्ठ अभियंता (म.जी.प्रा.मंडळ, सांगली यांचेमार्फत)
श्री.व्ही.डी.चौगुले, कनिष्ठ अभियंता (म.जी.प्रा.मंडळ, सांगली यांचेमार्फत)
श्री.सतिश दे. देशमुख, कनिष्ठ अभियंता (म.जी.प्रा.मंडळ, औरंगाबाद यांचेमार्फत)
श्री.अरविंद म. जोशी, कनिष्ठ अभियंता (म.जी.प्रा.मंडळ, सांगली यांचेमार्फत)
श्री.परमेश्वर ह. भिसे, कनिष्ठ अभियंता (म.जी.प्रा.मंडळ, सांगली यांचेमार्फत)
श्री.एस.पी.केंद्रे, कनिष्ठ अभियंता (म.जी.प्रा.मंडळ, नांदेड यांचेमार्फत)
श्री.व्ही.एस. दहिभाते, कनिष्ठ अभियंता (म.जी.प्रा.मंडळ, अमरावती यांचेमार्फत)
श्री.पी.एल.चव्हाण, कनिष्ठ अभियंता (म.जी.प्रा.मंडळ, लातूर यांचेमार्फत)
श्री.बी.आर.राठोड, कनिष्ठ अभियंता (म.जी.प्रा.मंडळ, औरंगाबाद यांचेमार्फत)
श्री.एकनाथ ह. जाधव, कनिष्ठ अभियंता (म.जी.प्रा.मंडळ, जळगांव यांचेमार्फत)
कार्यालयीन आदेश धारिका

परिशिष्ट- अ

मध्यवर्ती कार्यालयाचे आदेश क्र. मजीप्रा-२०१९/प्र.क्र.४/आस्था-६, दिनांक ११ .०८ .२०२३ च्या सोबतचे परिशिष्ट.

| अ. क्र. | कनिष्ठ अभियंत्यांचे नांव | जन्म दिनांक | शैक्षणिक अर्हता | कनिष्ठ अभियंता पदी नेमणूकीचा दिनांक | कनिष्ठ अभियंता पदावर ५,७ व १० वर्षे सेवा पुर्ण करीत आहेत तो दिनांक | वयाची ४५ वर्षे पूर्ण करीत असल्या बाबतचा दिनांक | शाखा अभियंता पदाचा दर्जा अनुज्ञेय दिनांक | व्यावसायिक परिक्षा उत्तीर्ण आहे / नाही व दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | श्री.व्ही.बी. मतवाडकर | १.४.६४ | स्था.अ. सहाय्यक | ३०.४.२००७ | २९.४.२०१७ | ३१.३.०९ | १.४.२०१८ | ऑक्टो-०१ |
| २ | श्री.एस.एस. कांबळे | १.६.६४ | स्था.अ. सहाय्यक | १.५.२००७ | ३०.४.२०१७ | ३१.५.०९ | १.४.२०१८ | ऑक्टो-९९ |
| ३ | श्री.ए.आय.खाडे | १.६.६१ | स्था.अ. सहाय्यक | ७.५.२००७ | ६.५.२०१७ | ३१.५.०६ | १.४.२०१८ | ऑक्टो-०२ |
| ४ | श्री.एम.एल. पारके | २.६.६३ | स्था.अ. सहाय्यक | ३.५.२००७ | २.५.२०१७ | १.६.०८ | १.४.२०१८ | ऑक्टो-०२ |
| ५ | श्री.वाय.व्ही. पाटील | २७.१२.६४ | स्था.अ. सहाय्यक | ७.५.२००७ | ६.५.२०१७ | २६.१२.०९ | १.४.२०१८ | ऑक्टो-०३ |
| ६ | श्री.एम.आर. जंगम | १.६.६५ | स्था.अ. सहाय्यक | १.५.२००७ | ३०.४.२०१७ | ३१.५.१० | १.४.२०१८ | ऑक्टो-०५ |
| ७ | श्री.आर.टी. देऊसकर | १.६.६६ | स्था.अ. सहाय्यक | १७.५.२००७ | १६.५.२०१७ | ३१.५.११ | १.४.२०१८ | ऑक्टो-९६ |
| ८ | श्री.बी.के. कोरेगांवे | २२.९.६४ | स्था.अ. सहाय्यक | २६.६.२००७ | २५.६.२०१७ | २१.९.०९ | १.४.२०१८ | ऑक्टो-९९ |
| ९ | श्री.एस.बी.पाटील | २.६.६५ | स्था.अ. सहाय्यक | २१.८.२००७ | २०.८.२०१७ | १.६.१० | १.४.२०१८ | ऑक्टो-९९ |
| १० | श्री.व्ही.डी.चौगुले | १.६.६५ | स्था.अ. सहाय्यक | २०.५.२००८ | १९.५.२०१८ | ३१.५.१० | १.४.२०१९ | ऑक्टो-११ |
| ११ | श्री.सतिश दे. देशमुख | १५.३.६३ | स्था.अ. सहाय्यक | २.४.२००७ | १.४.२०१७ | १४.३.०८ | १.४.२०१८ | ऑक्टो-२००० |
| १२ | श्री.अरविंद म. जोशी | २८.६.६१ | स्था.अ. सहाय्यक | ५.४.२००० | ४.४.२०१० | २७.६.०६ | १.४.२०११ | ऑक्टो-९९ |
| १३ | श्री.परमेश्वर ह. भिसे | ८.७.६४ | सिव्हील ड्राप्समन | १०.९.२००७ | ९.९.२०१७ | ७.७.०६ | १.४.२०१८ | ऑक्टो-०५ |

| अ. क्र. | कनिष्ठ अभियंत्यांचे नांव | जन्म दिनांक | शैक्षणिक अर्हता | कनिष्ठ अभियंता पदी नेमणूकीचा दिनांक | कनिष्ठ अभियंता पदावर ५,७ व १० वर्षे सेवा पुर्ण करीत आहेत तो दिनांक | वयाची ४५ वर्षे पूर्ण करीत असल्या बाबतचा दिनांक | शाखा अभियंता पदाचा दर्जा अनुज्ञेय दिनांक | व्यावसायिक परिक्षा उत्तीर्ण आहे / नाही व दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १४ | श्री.एस.पी.केंद्रे | ४.८.६५ | सिव्हील ड्राप्समन | ५.२.२००० | ४.२.२०१० | ३.८.१० | १.४.२०११ | ऑक्टो-९९ |
| १५ | श्री.व्ही.एस. दहिभाते | ४.६.७० | पदवीकाधारक | १.२.१९९३ | ३१.१.१९९८ | ३.६.१५ | १.४.२०१५ | ऑक्टो-१२ |
| १६ | श्री.पी.एल.चव्हाण | १.५.६७ | पदवीधर | १७.१०.१९९८ | १६.१०.२००३ | ३१.५.१२ | १.४.२००६ | ऑक्टो-०१ |
| १७ | श्री.बी.आर.राठोड | १२.६.६५ | पदवीधर | १७.१०.१९९८ | १६.१०.२००३ | ११.६.१० | १.४.२००४ | ऑक्टो-०१ |
| १८ | श्री.एकनाथ ह. जाधव | ९.५.४२ | इलेक्ट्रीशिअन (I.T.I.) | ९.९.१९८२ | ८.९.१९९२ | ८.५.८७ | १.४.१९९३ | सुट-२२.११.८८ |

DSR 11/8/23

(दिपाली देशपांडे सावेडकर)
मुख्य प्रशासकीय अधिकारी